# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
# भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ

फोन नं . ः०२२ – २४०९३११०
०२२ – २४०३१४९८
फॅक्स क्र ः ०२२ – २४०९३११०
www.cpfmseb.2011@gmail.com
website : www.mahadiscom.in

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
भविष्य निर्वाह निधी विभाग.
धारावी रोड. माटुंगा (पू) मुंबई ४०० ०१९ .

**क्र.लेवि/भनिनि /कनिवेयो/डी/ ३३४** **दिनांक:१३.०१.२०१५**

## परिपत्रक क्र-१९५

**विषय :-"कर्मचारी निवृत्ती वेतन योजना १९९५" चे निवृत्ती वेतन प्रस्ताव(Pension Proposals) सुधारीत पडताळणी यादी (Revised Checklist) नुसार भ.नि.नि.कार्यालयास सादर करणे बाबत.**

कर्मचारी सेवानिवृत्त / मृत्यु अथवा राजीनामा दिल्यानंतर निवृत्ती वेतन प्रस्ताव (Pension Proposals) सादर करणे सुलभ व्हावे म्हणून या क ार्यालयाने पडताळणी यादी उपलब्ध करून दिली असतांनाही बरेच निवृत्ती वेतन प्रस्ताव (Pension Proposals) परिपूर्ण नसल्यामुळे तृटींची पुर्तता करण्याकरिता परत पाठविले जात आहेत. ही बाब निदर्शनास आल्यामुळे सदरील पडताळणी यादीमध्ये सुधारणा करून सुधारित पडताळणी यादी (Revised Checklist) भ.नि.नि. कार्यालयाने उपलब्ध करून दिली आहे.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सुचित करण्यात येते की, निवृत्ती वेतन प्रस्ताव (Pension Proposals) सादर करते वेळी सोबत जोडलेल्या सुधारीत पडताळणी यादी (Revised Checklist) नुसार कागदपत्रांची तपासणी करून पुर्तता करावी व सुधारीत पडताळणी यादीसह निवृत्ती वेतन प्रस्ताव (Pension Proposals) या कार्यालयास सादर करावेत. सुधारीत पडताळणी यादी नुसार प्रस्ताव सादर न झाल्यास असे प्रस्ताव परत पाठविले जातील व त्यामुळे होणा-या विलंबास वा अन्य परिणामांस संबधीत कार्यालय जबाबदार असतील. याची कृपया नोंद घ्यावी.

- हे परिपत्रक महानिर्मिती/महापारेषण/महावितरण कंपनींच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**महाव्यवस्थापक (भ.नि.नि.)**

सहपत्रः- सुधारीत पडताळणी यादी.

१.ज्या कर्मचा-यांनी प्रत्यक्ष १० वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी सोडली आहे, अशा कर्मचा-यां-यासाठी.
२.जे कर्मचारी प्रत्यक्ष सेवानिवृत्त झाले आहेत, अशा कर्मचा-यांसाठी.
३.जे कर्मचारी मयत झाले आहेत, अशा कर्मचा-यांच्या वारसांसाठी.

प्रतः- प्रेषण यादीप्रमाणेः-
महानिर्मिती/महापारेषण/महावितरण

C:\Documents and Settings\snsakharle\Desktop\Pension Mar.doc42

# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,भविष्य निर्वाह निधी विभाग

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, धारावी रोड, माटुंगा (पूर्व) मुंबई-१९

## नमुना क्र.१० - क सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

( ज्या कर्मचा-यांनी प्रत्यक्ष १० वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी नोकरी सोडली आहे, अशा कर्मचा-यांसाठी.)

| | होय | नाही |
|---|---|---|
| १. नमुना क्र. १० क अर्जाचे तीन संच (मुळ प्रतीत ) भरलेले आहेत का ? | ------ | ------ |
| २. सभासदाच्या (अर्जदाराच्या) जन्मदाखल्याच्या/शाळा सोडण्याच्या दाखल्याच्या तीन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ३. सभासदाचे (अर्जदाराचे) सेवापुस्तीकेतील पहिल्या पानाच्या तीन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ४. सभासदाचे(अर्जदाराचे) स्वतंत्र बँक खाते नमुना क्र.१० क मध्ये नमुद करून खाते पुस्तीकेच्या पहिल्या पानाच्या तीन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ५. नमुना क्र.१० क मध्ये नमुद केलेल्या बँकेचा रद्द केलेला (Cancel) धनादेश (Cheque) जोडला आहे का ? | ------ | ------ |
| ६. सभासदाचे (अर्जदाराचे) <u>पासपोर्ट आकाराचे</u> तीन रंगीत छायाचित्राच्या (Photo)मागे सभासदाचा क.नि.वे.क्र.नमुद करून सक्षम अधिकारी यांच्या सही शिक्क्यानिशी जोडले आहे का ? | ------ | ------ |
| ७. सभासद क.नि.वे.यो.चा सभासद झाल्यापासून ते निवृत्ती दिनांकापर्यंतचा बिनपगारी रजेचा महिनावार तपशिल विहीत तक्त्यात लेखापरिक्षीत करून जोडला आहे का ? | ------ | ------ |
| ८. सभासदाची डिसें-१९९५ पर्यंतची बिनपगारी रजेची बेरीज आणि जानेवारी -१९९६ पासून सभासदाच्या सेवासमाप्तीपर्यंतची बिनपगारी रजेची बेरीज बिनपगारी रजेच्या तक्त्यात वेगवेगळी दाखविली आहे का ? | ------ | ------ |
| ९.सभासदाच्या स्वेच्छानिवृत्ती होण्याआधीच्या १२ महिन्याच्या पगाराचा महिनावार तपशिल विहीत तक्त्यात लेखापरिक्षित करून जोडला आहे का? (पगाराचा तपशिल महिनावार क.नि.वेच्या कपात व रोखा प्रमाणक क्र. व दिनांकासह लेखापरिक्षित करून सादर करावा) | ------ | ------ |



C:\Documents and Settings\snsakharle\Desktop\Pension Mar.doc43

## नमुना क्र.१० - क सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

( ज्या कर्मचा-यांनी प्रत्यक्ष १० वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी नोकरी सोडली आहे, अशा कर्मचा-यांसाठी.)

---

१०. सभासदाच्या स्वेच्छानिवृत्ती होण्याआधीच्या १२ महिन्याच्या कालावधीत एकत्रित पुरवणी पगार दिला गेला असल्यास त्याचे महिनावार विवरण पत्र क.नि.वे. कपातीसह लेखापरिक्षित करून जोडले आहे का? ------ ------

११. नमुना क्र १० क मधील रकाना क्र.१२ वर सभासदाने (अर्जदाराने) स्वाक्षरी केली आहे का ? ------ ------

१२. सभासदाने (अर्जदाराने) नोकरी सोडण्याआधीच्या दोन वर्ष कालावधीचा बिन पगारी रजा मंजुरीचा कार्यालयीन आदेश जोडला आहे का ? ------ ------

१३. सभासदाच्या (अर्जदाराच्या ) नावात तफावत असल्यास त्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्राची प्रत (Gazzet) जोडली आहे का ? ------ ------

१४. नमुना क्र. १० क अर्जातील रकाना क्र.१३ मध्ये रेव्हेन्यूव स्टँप लावून त्यावर सभासदाने (अर्जदाराने) सही केली आहे का ? ------ ------

१५. स्वेच्छा निवृत्ती /बडतर्फ असणा-या सभासदाने (अर्जदाराने) स्वेच्छा निवृत्ती घेतल्याचा/बडतर्फ केल्याचा कार्यालयीन आदेश सांक्षांकीत करून तीन प्रतीत जोडला आहे का ? ------ ------

१६. नमुना क्र. १० क अर्जावर सभासदाचा (अर्जदाराचा) दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक नमुद केला आहे का ? ------ ------

१७. नमुना क्र.१० क मधील रकाना क्र.८मध्ये आवश्यक माहिती नमुद केली आहे का ? ------ ------

१८. नमुना क्र.१० क व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांमध्ये खाडाखोड असल्यास त्या ठिकाणी सभासदाने (अर्जदाराने) स्वाक्षरी केली आहे का ? ------ ------

२/३

## नमुना क्र.१० - क सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

( ज्या कर्मचा-यांनी प्रत्यक्ष १० वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी नोकरी सोडली आहे, अशा कर्मचा-यांसाठी.)

---

१९. सभासदाने (अर्जदाराने) नमुना क्र. १० क चा प्रस्ताव सादर केल्यानंतर प्रस्तावाची हाताळणी करतांना बरेचदा नमुना क्र.१० क चा अर्ज जीर्ण झालेला असतो अशावेळी नविन अर्ज भरला जातो परंतू प्रस्तावासोबत जुना नमुना क्र.१० क अर्ज जोडला जात नाही. तरी दोन्हीही नमुने (जुना नमुना क्र. १० क व नविन नमुना क्र.१० क) प्रस्तावासोबत जोडले आहेत का ? ------ ------

२०. पेन्शन प्रकरण पाठविण्यास ६ महिन्यापेक्षा जास्त विलंब झाला असल्यास कार्यालयाने व सभासदाने त्याचे सविस्तर स्पष्टीकरण जोडले आहे का ? ------ ------

२१. नमुना क्र.१० क सोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या सुस्पष्ट दिसणा-या प्रत्येकी तीन साक्षांकित प्रती जोडल्या आहेत का ? ------ ------

<u>अत्यंत महत्वाची सुचना</u>

नमुना क्र. १० क अर्जासोबत जोडलेल्या चेकलिस्ट नुसार पेन्शन प्रस्ताव प्रमाणीत करून या कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे. तसेच या चेकलिस्ट व्यतिरीक्त क्षेत्रिय भ.नि.नि. आयुक्त कार्यालय, बांद्रा (पूर्व) मुंबई५१. यांनी दर्शविलेल्या त्रुटींची पुर्तता करणेस कर्मचारी/कार्यालयास बंधनकारक राहील. चेकलिस्टसह त्रुटींची पुर्तता करून प्रस्ताव न पाठविल्यास असे प्रस्ताव परत पाठविले जातील व त्यामुळे होणा-या विलंबास वा अन्य परिणामास संबंधीत कार्यालय जबाबदार राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

महाव्यवस्थापक (भ.नि.नि.)

# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,भविष्य निर्वाह निधी विभाग

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, धारावी रोड, माटुंगा (पूर्व) मुंबई-१९

## नमुना क्र.१० -ड सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

(जे कर्मचारी प्रत्यक्ष सेवानिवृत्त झाले आहेत, अशा कर्मचा-यांसाठी.)

---

| | होय | नाही |
|---|---|---|
| १. नमुना क्र.१० ड अर्जाचे तीन संच (मुळ प्रतीत ) भरलेले आहेत का ? | ------ | ------ |
| २. सभासदाच्या (अर्जदाराच्या) जन्मदाखल्याच्या/शाळा सोडल्याच्या दाखल्याच्या तीन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ३. सभासदाच्या (अर्जदाराच्या) सेवापुस्तीकेतील पहिल्या पानाच्या तीन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ४. क्षेत्रिय भविष्य निधी कार्यालयाने निर्देशित केलेल्या कोणत्याही एका बँकेत सभासदांचे स्वतंत्र पेन्शन खाते उघडून पेन्शन बँकखाते पुस्तिकेतील पहिल्या पानाच्या सुस्पष्ट दिसणा-या तीन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? **(SBI Bank, Bank of India, Axis Bank, ICICI Bank, HDFC Bank,Punjab National Bank)** | ------ | ------ |
| ५. नमुना क्र. १०ड मधील रकाना क्र.१२ मध्ये फक्त वय वर्ष २५ च्या आतील आपंत्याचाच उल्लेख करावा व त्यांच्या जन्म प्रमाणपत्राच्या तीन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ६. सभासद व पत्नी / पती यांचे पासपोर्ट आकाराचे रंगीत एकत्रित छायाचित्र ( Group Photo) व स्वतंत्र छायाचित्र (Photo) प्रत्येकी तीन छायाचित्रांच्या मागे सभासदाचा क.नि.वे क्र. नमुद करून सक्षम अधिकारी यांच्या सही शिक्क्यानिशी जोडले आहेत का ? | ------ | ------ |
| ७. सभासद क.नि.वे.यो.चा सभासद झाल्यापासून ते निवृत्ती दिनांकापर्यंतचा बिनपगारी रजेचा महिनावार तपशिल विहीत तक्त्यात लेखापरिक्षीत करून जोडला आहे का ? | ------ | ------ |
| ८. सभासदाची डिसेंबर-१९९५ पर्यंतची बिनपगारी रजेची बेरीज आणि जानेवारी -१९९६ पासून सभासदाच्या सेवासमाप्तीपर्यंतची बिनपगारी रजेची बेरीज बिनपगारी रजेच्या तक्त्यात वेगवेगळी दाखविलेली आहे का ? | ------ | ------ |
| ९. सभासद रोजंदारी कामगार (NMR) असल्यास त्याचा रोजंदारी कामगार असल्यापासूनचा बिनपगारी रजेचा महिनावार तपशिल विहीत तक्त्यात लेखापरिक्षीत करून जोडला आहे का ? | ------ | ------ |

## नमुना क्र.१० -ड सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)
## (जे कर्मचारी प्रत्यक्ष सेवानिवृत्त झाले आहेत, अशा कर्मचा-यांसाठी.)

---

१०.सभासदाची वयाची ५८ वर्षे पूर्ण होण्याआधीच्या १२ महिन्यांचा पगाराचा तपशिल दर्शविणारा तक्ता लेखापरिक्षीत करून जोडला आहे का ? (पगाराचा तपशिल महिनावार क.नि.वे.च्या कपात व रोखा प्रमाणक क्र. व दिनांकासह लेखा परिक्षीत करून सादर करावा) ------ ------

११. सभासदाच्या वयाच्या ५८ वर्षे पूर्ण होण्याआधीच्या १२ महिन्यांच्या कालावधीत एकत्रित पुरवणी पगार दिला गेला असल्यास त्याचे महिनावार विवरणपत्र क.नि.वे.कपातीसह लेखापरिक्षीत करून जोडले आहे का ? ------ ------

१२. नमुना क्र.१० ड मधील रकाना क्र.१७ वर सभासदाने (अर्जदाराने) स्वाक्षरी केली आहे का ? ------ ------

१३. नमुना क्र.१० ड मधील नमुना हस्ताक्षर प्रपत्रावर सभासदाने (अर्जदाराने) एकूण १० स्वाक्ष-या केल्या आहेत का ? ------ ------

१४. सभासदाने (अर्जदाराने) नमुना क्र१० ड मधील रकाना क्र. ८ अ मध्ये वयाची ५० वर्षे पुर्ण झाल्याच्या तारखेची नोंद केली आहे का ? ------ ------
(फक्त स्वेच्छानिवृत्त व बडतर्फ कर्मचा-यांसाठी)

१५. सभासद (अर्जदार) वयाची ५८ वर्षे पूर्ण होण्याआधीच स्वेच्छानिवृत्त/बडतर्फ झाला असल्यास व पेन्शन प्रकरण सादर करण्यास उशिर होउन वयाची ५८ वर्षे पूर्ण झाली असल्यास नमुना क्र.१० ड मधील रकाना क्र.०२ मध्ये "वार्धक्य निवृत्ती वेतन " असे नमुद केले आहे का ? ------ -------

१६.सभासदास (अर्जदारास) भांडवल परताव्याचा लाभ दयावयाचा झाल्यास खालील रकाने भरले आहेत का? ------ ------
(दि.२६सप्टेबर २००८ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांनाच लागू.)

(पत्नीला भांडवल परताव्याचा लाभ दयावयाचा झाल्यास रकाना क्र.१०मधील क्र.१ किंवा क्र.३ हा पर्याय निवडून रकाना क्र.११ मध्ये पत्नीचे नामनिर्देशन नमुद करावे.सभासदाची (अर्जदाराची) पत्नी/पती हयात असल्यास व अपत्यांस भांडवल परताव्याचा लाभ दयावयाचा झाल्यास रकाना क्र.१०मधील क्र.२ हा पर्याय निवडून रकाना क्र.११मध्ये अपत्यांचे नामनिर्देशन करावे. तसेच सभासदाची (अर्जदाराची) पत्नी/पती हयात नसल्यास व अपत्यांस भांडवल परताव्याचा लाभ दयावयाचा झाल्यास रकाना क्र.१०मधील क्र.३ चा पर्याय निवडून रकाना क्र.११ मध्ये अपत्यांचे नामनिर्देन करावे.)

## नमुना क्र.१० -ड सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

**(जे कर्मचारी प्रत्यक्ष सेवानिवृत्त झाले आहेत, अशा कर्मचा-यांसाठी.)**

---

१७. सभासदाच्या (अर्जदाराच्या ) मृत्युनंतर वारसाला भांडवल परतावा मिळत असल्यामुळे नमुना क्र.१० ड मधील रकाना क्र.९,१०,११ भरला आहे का ? ------ ------
(दि.२६सप्टेबर २००८ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांनाच लागू.)

१८. नमुना क्र. १० ड मधील रकाना क्र.९,१०,११ हा एच्छिक पर्याय खाडाखोड न करता योग्य प्रकारे भरला जाणे आवश्यक आहे. खाडाखोड झाल्यास सभासदाने (अर्जदाराने) स्वाक्षरी केली आहे का ?
(दि.२६सप्टेबर २००८ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांनाच लागू.) ------ ------

१९. सभासदाचे (अर्जदाराचे) नावात तफावत असल्यास महाराष्ट्र शासनाचे राजपत्र (Gazzet) सादर करावे व नमुना क्र. १० ड मधील हस्ताक्षर नमुना नविन नावाने सादर करावा व नविन नावानेच बँक खाते उघडले आहे का ? ------ ------

२०. सभासदाची (अर्जदाराची) पहिली पत्नी हयात नसेल आणि दुस-यांदा विवाह केला असल्यास दुस-या पत्नीचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर कले आहे का ? ------ ------

२१. जिल्हा वैद्यकीय अधिकारी यांच्या प्रमाणपत्रा अन्वये सभासद (अर्जदार) स्वतः १०० टक्के अपंग असल्यास परिशिष्ट क्र.१,२,३ सादर केले आहे का ? ------ ------

२२. चतुर्थ श्रेणी कर्मचारी वयाची ६० वर्षे पूर्ण होताच निवृत्त होतो, तथापी क.नि.वे.यो. करिता सभासद (अर्जदार) वयाची ५८ वर्षे पूर्ण होताच पात्र असल्याने त्यांचा पेन्शन प्रस्ताव चेकलिस्ट नुसार या कार्यालयास पाठविला आहे का ? ------ ------

२३. सभासदाच्या (अर्जदाराच्या) सेवानिवृत्ती/स्वेच्छा निवृत्ती /बडतर्फीच्या कार्यालयीन आदेशाच्या तीन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? ------ ------

२४. सभासदाची पत्नी/ पती हयात नसल्यास तीच्या/त्याच्या मृत्यु दाखल्याची मुळ (Original) प्रत अथवा घटस्फोटीत असल्यास सक्षम न्यायालयाने घटस्फोट मंजूर केलेल्या आदेशाच्या तीन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? ------ ------

२५. नमुना क्र.१० ड मधील सभासद व त्याच्या कुटुंबीयांची नोंदविलेली माहिती त्याने सादर केलेल्या कागदपत्रांशी सुसंगत आहे का ? ------ ------

३/४

## नमुना क्र.१० -ड सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

### (जे कर्मचारी प्रत्यक्ष सेवानिवृत्त झाले आहेत, अशा कर्मचा-यांसाठी.)

---

२६. नमुना क्र.१० ड मधील रकाना क्र ८ मध्ये सभासदाचा (अर्जदाराचा) कायमचा पूर्ण पत्ता व भ्रमणध्वणी क्रमांक (Mobile No.) नमुद केला आहे का ? ------ ------

२७. सभासद (अर्जदार) या आस्थापनेत रूजू होण्याआधी इतर कुठल्याही आस्थापनेत कार्यरत असल्यास त्याचा सविस्तर तपशिल नमुना क्र.१० ड मधील रकाना क्र.१५ व १६ मध्ये नमुद करून त्याची कागदपत्रे जोडली आहेत का ? ------ ------

२८. नमुना क्र.१०ड व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांमध्ये खाडाखोड असल्यास सभासदाने (अर्जदाराने) त्या ठिकाणी स्वाक्षरी केली आहे का ? ------ ------

२९. सभासदाने (अर्जदाराने) नमुना क्र.१० ड चा प्रस्ताव सादर केल्यानंतर प्रस्तावाची हाताळणी करतांना बरेचदा नमुना क्र.१०ड चा अर्ज जीर्ण झालेला असतो,अशावेळी नविन अर्ज भरला जातो परंतू प्रस्तावासोबत जुना नमुना क्र.१०ड नमुना अर्ज जोडला जात नाही. तरी दोन्हीही नमुने (जुना नमुना क्र१०ड व नविन नमुना क्र.१०ड ) प्रस्तावासोबत जोडले आहेत का ? ------ ------

३०. पेन्शन प्रकरण पाठविण्यास ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागल्यास कार्यालयाने/सभासदाने त्याचे सविस्तर स्पष्टीकरण जोडले आहे का ? ------ ------

३१. नमुना क्र.१० ड सोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या सुस्पष्ट दिसणा-या प्रत्येकी तीन साक्षांकित प्रती जोडल्या आहेत का ? ------ ------

<u>अत्यंत महत्वाची सुचना</u>

नमुना क्र. १० ड अर्जासोबत जोडलेल्या चेकलिस्ट नुसार पेन्शन प्रस्ताव प्रमाणीत करून या कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे. तसेच या चेकलिस्ट व्यतिरीक्त क्षेत्रिय भ.नि.नि. आयुक्त कार्यालय, बांद्रा (पूर्व) मुंबई५१. यांनी दर्शविलेल्या त्रुटींची पुर्तता करणेस कर्मचारी/कार्यालयास बंधनकारक राहील. चेकलिस्टसह त्रुटींची पुर्तता करून प्रस्ताव न पाठविल्यास असे प्रस्ताव परत पाठविले जातील व त्यामुळे होणा-या विलंबास वा अन्य परिणामास संबंधीत कार्यालय जबाबदार राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

महाव्यवस्थापक (भ.नि.नि.)

# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,भविष्य निर्वाह निधी विभाग

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, धारावी रोड, माटुंगा (पूर्व) मुंबई-१९

## नमुना क्र.१० -ड सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

(जे कर्मचारी मयत झाले आहेत, अशा कर्मचा-यांच्या वारसांसाठी)

| | होय | नाही |
|---|---|---|
| १. नमुना क्र.१० ड अर्जाचे तीन संच (मुळ प्रतीत ) भरलेले आहेत का ? | ------ | ------ |
| २. मयत कर्मचा-याच्या मृत्यु दाखल्याची एक मुळ प्रत (Origional Copy) व तीन साक्षांकित छायाप्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ३. मयत कर्मचा-याच्या जन्मदाखला /शाळा सोडल्याच्या दाखल्याच्या तीन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ४. मयत कर्मचा-याच्या सेवापुस्तीकेतील पहिल्या पानाच्या तीन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ५. नमुना क्र. १०ड मधील रकाना क्र.१२ मध्ये फक्त वय वर्ष २५ च्या आतील आपंत्याचाच उल्लेख करावा व त्यांच्या जन्म प्रमाणपत्राच्या प्रत्येकी तीन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? | ------ | ------ |
| ६. मयत कर्मचा-याच्या पत्नी/पती व वय वर्ष २५ च्या आतील अपत्यांचे पासपोर्ट आकाराचे रंगीत एकत्रित छायाचित्र ( Group Photo) व स्वतंत्र छायाचित्र (Photo) प्रत्येकी तीन छायाचित्रांच्या मागे मयत कर्मचा-याचा क.नि.वे.क्र. नमुद करून सक्षम अधिकारी यांच्या सही-शिक्क्यानिशी जोडले आहेत का? | ------ | ------ |
| ७. मयत कर्मचा-याच्या वय वर्ष २५ च्या आतील मुलींचे विवाह झाले असल्यास नमुना क्र. १० ड मध्ये सासरच्या नावाने नोंद करून त्या सोबत विवाह नोदणी दाखले जोडले आहेत का ? | ------ | ------ |
| ८. मयत कर्मचा-याच्या वय वर्ष २५ च्या आतील विवाहीत मुलींनी त्यांचे स्वतंत्र बँकखाते त्यांच्या सासरच्या नावाने उघडले आहे का ? | ------ | ------ |
| ९. क्षेत्रिय भविष्य निधी कार्यालयाने खालील निर्देशित केलेल्या कोणत्याही बँकेतील एकाच शाखेत मयत कर्मचा-याच्या पत्नी /पती व त्यांची वय वर्ष-२५ च्या आतील अपत्यांचे स्वतंत्र पेन्शन खाते उघडून पेन्शन बँकखाते पुस्तिकेतील पहिल्या पानाच्या तीन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? **(SBI Bank, Bank of India, Axis Bank, ICICI Bank, HDFC Bank,Punjab National Bank)** | ------ | ------ |

## नमुना क्र.१० -ड सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)
### (जे कर्मचारी मयत झाले आहेत, अशा कर्मचा-यांच्या वारसांसाठी)

---

१०. मयत कर्मचारी क.नि.वे.यो.चा सभासद झाल्यापासून ते मृत्यु दिनांकापर्यंतचा बिनपगारी रजेचा महिनावार तपशिल विहीत बिनपगारी रजेच्या तक्त्यात लेखापरिक्षीत करून जोडला आहे का ? ------ ------

११. मयत कर्मचा-याच्या वारसांच्या नावात तफावत असल्यास महाराष्ट्र शासनाचे राजपत्र (Gazzet) सादर करावे व नमुना क्र. १० ड मधील हस्ताक्षर नमुना नविन नावाने सादर करून नविन नावानेच बँक खाते उघडले आहे का ? ------ ------

१२. मयत कर्मचा-याची डिसेंबर -१९९५ पर्यंतची बिनपगारी रजेची बेरीज आणि जानेवारी -१९९६ पासून सभासदाच्या सेवासमाप्तीपर्यंतची बिनपगारी रजेची बेरीज बिनपगारी रजेच्या तक्त्यात वेगवेगळी दाखविलेली आहे का ? ------ ------

१३. मयत कर्मचारी रोजंदारी कामगार (NMR) असल्यास त्याचा रोजंदारी कामगार असल्यापासूनचा बिनपगारी रजेचा महिनावार तपशिल विहीत तक्त्यात लेखापरिक्षीत करून जोडला आहे का ? ------ ------

१४. कर्मचा-याचा मृत्यु होण्याआधीच्या १२ महिन्याच्या पगाराचा महिनावार तपशिल विहीत तक्त्यात लेखापरिक्षीत करून जोडलेला आहे का ? (पगाराचा तपशिल महिनावार क.नि.वे.च्या कपात व रोखा प्रमाणक क्र.व दिनांकासह लेखापरिक्षीत करून सादर करावा) ------ ------

१५. कर्मचा-याच्या मृत्यु होण्याआधीच्या १२ महिन्याच्या कालावधीत एकत्रित पुरवणी पगार दिला गेला असल्यास त्याचे महिनावार विवरणपत्र क.नि.वे. कपातीसह लेखापरिक्षीत करून जोडला आहे का ? ------ ------

१६. तहसिलदाराने / कार्यकारी दंडाधिका-याने दिलेला वारसाचा दाखला/ लिगल हेअर सर्टिफिकेट / कोर्टाचे सक्सेशन सर्टिफिकेट जोडले आहे का ? ------ ------

१७. कर्मचारी हरवलेल्या प्रकरणात पोलीस स्टेशनमध्ये (F. I. R.) दाखल केल्याची प्रत जोडावी त्यासबंधी संबंधीत न्यायालयाचा निर्णय अंतीम राहील. त्या अंतीम निर्णयाची प्रत तसेच न्यायालयाचे आदेशाप्रमाणे मिळालेल्या मृत्यु दाखल्याची मुळ प्रत (Origional Copy) व दोन साक्षाकींत छायाप्रती जोडल्या आहेत का ? ------ ------

१८. मयत कर्मचा-याच्या स्वतंत्र कुटुंबाची यादी सादर करतांना विहीत नमुन्यात सर्व वारसांची नावे व जन्मतारखा नमुद करून तीन प्रतीत साक्षांकीत करून जोडली आहे का ? ------ ------

## नमुना क्र.१० -ड सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)

(जे कर्मचारी मयत झाले आहेत, अशा कर्मचा-यांच्या वारसांसाठी)

---

१९. क.नि.वे. योजना १९९५ चा फॉर्म एफ -२ (पेन्शन नॉमिनेशन ) व अंतिम भ.नि.नि.प्रदान केल्याची प्रत जोडली आहे का ? ------ ------

२०. नमुना क्र.१०ड मधील रकाना क्र.१७ वर अर्जदाराने स्वाक्षरी केली आहे का ? ------ ------

२१. नमुना क्र.१० ड मधील नमुना हस्ताक्षर प्रपत्रावर मयत कर्मचा-याच्या पात्र वारसांनी प्रत्येकी एकूण १० स्वाक्ष-या केल्या आहेत का ? ------ ------

२२. मयत कर्मचा-याच्या एकापेक्षा अधिक पत्नी हयात असल्यास त्या प्रत्येकीचे विवाह नोंदणी दाखले जोडले आहेत का ? ------ ------

२३. मयत कर्मचा-याच्या भ.नि.नि. नामनिर्देशनाची प्रत जोडली आहे का ? ------ ------

२४. कर्मचा-याचा मृत्यु होण्याआधी सेवानिवृत्ती/स्वेच्छा निवृत्ती /बडतर्फी झाली असल्यास कार्यालयीन आदेशाच्या तीन साक्षांकीत प्रती जोडल्या आहेत का ? ------ ------

२५. नमुना क्र.१० ड मधील शेवटच्या पानावरील आस्थापनाचे मालक/ नियुक्त अधिकारी म्हणून संबधीत सक्षम अधिका-याने स्वाक्षरी केली आहे का ? ------ ------

२६. नमुना क्र.१० ड मधील मयत कर्मचा-याच्या वारसांनी नोंदविलेली माहिती त्याने सादर केलेल्या कागदपत्रांशी सुसंगत आहे का ? ------ ------

२७. नमुना क्र. १० ड मधील रकाना क्र ८ मध्ये मयत कर्मचा-याच्या वारसाचा कायमचा पूर्ण पत्ता व भ्रमणध्वणी क्रमांक (Mobile No.) नमुद केला आहे का ? ------ ------

२८. मयत कर्मचारी या आस्थापनेत रूजू होण्याआधी इतर कुठल्याही आस्थापनेत कार्यरत असल्यास त्याचा सविस्तर तपशिल नमुना क्र.१०ड मधील रकाना क्र.१५ व १६ मध्ये नमुद करून त्याची कागदपत्रे जोडली आहेत का ? ------ ------

२९. मयत कर्मचा-याचा वारसांपैकी कोणी अपंग असल्यास जिल्हा शल्य चिकित्सक (Civil Surgeon)यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडले आहे का ? ------ ------

३/४

## नमुना क्र.१० -ड सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची पडताळणी यादी (चेक लीस्ट)
### (जे कर्मचारी मयत झाले आहेत, अशा कर्मचा-यांच्या वारसांसाठी)

---

३०. मयत कर्मचा-याच्या वारसाने नमुना क्र. १० ड चा प्रस्ताव सादर केल्यानंतर प्रस्तावाची हाताळणी करतांना बरेचदा नमुना क्र.१०ड चा अर्ज जीर्ण झालेला असतो, अशावेळी नविन अर्ज भरला जातो परंतू प्रस्तावासोबत जुना नमुना क्र.१०ड अर्ज जोडला जात नाही. तरी दोन्हीही नमुने(जुना नमुना क्र. १०ड व नविन नमुना क्र. १०ड) प्रस्तावासोबत जोडले आहेत का ? ------ ------

३१. नमुना क्र.१०ड व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांमध्ये खाडाखोड असल्यास अर्जदाराने त्या ठीकाणी स्वाक्षरी केली आहे का ? ------ ------

३२. पेन्शन प्रकरण पाठविण्यास ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागल्यास कार्यालयाने मयत कर्मचा-याच्या वारसाने त्याचे सविस्तर स्पष्टीकरण जोडले आहे का ? ------ ------

३३. नमुना क्र.१० ड सोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या सुस्पष्ट दिसणा-या प्रत्येकी तीन साक्षांकित प्रती जोडल्या आहेत का? ------ ------

<u>अत्यंत महत्वाची सुचना</u>

नमुना क्र. १० ड अर्जासोबत जोडलेल्या चेकलिस्ट नुसार पेन्शन प्रस्ताव प्रमाणीत करून या कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे. तसेच या चेकलिस्ट व्यतिरीक्त क्षेत्रिय भ.नि.नि. आयुक्त कार्यालय, बांद्रा (पूर्व) मुंबई५१. यांनी दर्शविलेल्या त्रुटींची पुर्तता करणेस कर्मचारी/कार्यालयास बंधनकारक राहील. चेकलिस्टसह त्रुटींची पुर्तता करून प्रस्ताव न पाठविल्यास असे प्रस्ताव परत पाठविले जातील व त्यामुळे होणा-या विलंबास वा अन्य परिणामास संबंधीत कार्यालय जबाबदार राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

महाव्यवस्थापक (भ.नि.नि.)